# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 18/10/2019 (शुक्रवार)
# (दुपार)

---

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 06 कि.मी. अंतरावरील मौजा देवळी गुजर शिवार बुटीबोरी उमरेड रोड येथे दिनांक 17/10/2019 चे 19.30 वा. दरम्यान अज्ञात चार चाकी आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच–40/एझेड– 3768 क्रमांकाचा मोटरसायकला मागुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकल स्वार 1) पुण्यवसु राजु शेंद्रे व 2) गणेश मनोहर वावधणे दोन्ही रा. शिरूड हे गंभीर जखमी त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – धर्मपाल श्रीराम ढगे, वय 40 वर्ष, रा. देवळी गुजर, ता जि. नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304(अ) भादंवी. सहकलम 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि चौधरी 9273237381 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर